# भरती जाहीरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय नागरी अमरावती दक्षिण या नागरी भागातील रिक्त असलेल्या जवळपास 3 अंगणवाडी मदतनिस

1) वरुड नगरपरिषद ( 2 सामान्य )

2) चांदुर बाजार नगर परिषद—(1- उर्दुभाषिक)

या पदासाठी संबंधित नगरपरिषद क्षेत्रातुन पात्र महिला उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे

**अर्जाचा कालावधी** :- 7/9/2026 ते 23/9/2026

**वय**:-18 वर्ष ते 35 वर्ष तसेच विधवा उमेदवारांसाठी वय 40 पर्यंत असेल

**शैक्षणिक अर्हता**:- 12 वी पास

अधिक माहितीसाठी खालील कार्यालयात संपर्क साधवा तसेच सर्व माहिती व अर्ज **amravati.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच अंगणवाडी सेविकेच्या Whatsapp वर उपलब्ध आहे.

**कार्यालयाचा पत्ता**:- बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय नागरी अमरावती दक्षिण ,दत्त पॅलेस बिल्डींग , गांधी चौक अमरावती

**टिप**:- अर्ज वगळुन सोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रे मार्कशीट, कागदपत्रे यांना अनुक्रमांक टाकावेत.

स्वा/-

बाल विकास प्रकल्प अधिकारी

(ना) अमरावती नागरी दक्षिण

**बालविकासप्रकल्पअधिकारी,**
**नागरीप्रकल्पअमरावती दक्षिण**
कार्यालयाचापत्ता:-**दत्तपॅलेस,पहीलामजला,गांधीचौक,अमरावती**
दुरध्वनीक्र.:-(0721)25991156,Email-Id:cdpoamravatisouth@gmail.com

---

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शा.नि. एबाविसे-2022/प्रक्र94/का-6 दिनांक – 2/02/2023 व 30 जानेवारी 2025 नुसार एकात्मिक बाल सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंगणवाडी मदतनिसांचे रिक्त पदे सरळ नियुक्तीने ( By Nomination) भरण्यासाठी पात्र महिला उमेदवारांकडुन अर्ज वरीलप्रमाणे नमुद पत्त्यावर मागणी करण्यात येत आहे. अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्तीसंदर्भात आवश्यक शैक्षणीक पात्रता , अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.सदरअर्ज अमरावती नागरी दक्षिण प्रकल्प अंतर्गत करावेत

| अ.क्र. | तपशिल | अटी व शर्ती (वरुड -2 पदे (सामान्य)<br>(चांदुर बाजार -1 पद (उर्दुभाषिक) |
|---|---|---|
| 1 | पदावे नाव | अंगणवाडी मदतनिस (मानधनी सेवा) |
| 2 | मानधन | एकत्रित मानधन शासन निर्णयाप्रमाणे |
| 3 | पदाचे / कामाचे स्वरुप | अंगणवाडी सेविकांना सहाय्य करणे, दैनंदीन अंगणवाडी केंद्र उघडणे, अंगणवाडी स्वच्छता करणे, पिण्याचे पाणी भरणे, लाभार्थ्यांना अंगणवाडीत बोलावणे, अंगणवाडीत सेविकांचे निर्देशानुसार कामे पार पाडणे |
| 4 | शैक्षणिक पात्रता | किमान इयत्ता 12 वी उत्तीर्ण (राज्य शिक्षणमंडळ अथवा त्यास समकक्ष) |
| 5 | वास्तवाची अट | उमेदवार हा स्थानिक प्रकल्पाअंतर्गत असावा (स्थानिक रहीवाशी बाबतशासनाने निश्चीत केलेला पुराव सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>1. गॅस कार्ड/ बँक पासबुक जाहीरातीच्या दिनांकाच्या एक महिना अगोदरचे<br>2. घरटॅक्स पावती (घर भाडयाने असल्यास घरमालकाची Affidavite copy)<br>3. इलेक्ट्रीक बील<br>4. राशन कार्ड<br>5. आधार कार्ड<br>6. मतदार कार्ड |

| | | |
|---|---|---|
| | | 7. स्वयंघोषणापत्र<br>यापैकी उपलब्ध पुराव्यानुसार वास्तव ठरविण्याचे अधिकार कार्यालयाला राहतील.<br>वास्तव्यासंबंधी वाद उदभवल्यास चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात येईल. |
| 6 | वयाची अट | दिनांक 03/09/2026 रोजी किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे आणि विधवा उमेदवारांसाठी वयोमर्यादा कमाल 40 वर्ष राहील. |
| 7 | लहान कुटुंब | 1.उमेदवारास जास्तीत जास्त 2 हयात अपत्य असावे.<br>2. उमेदवाराला 2 हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्त्यासह)अधिक अपत्त्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतुन तात्काळ सेवा मुक्त करण्यात येईल तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| 8 | भाषेचे ज्ञान | मराठी भाषा (उमेदवाराने इयत्ता 10 मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे)त्यासाठी 10 वी बोर्ड सर्टीफिकेट सोबत जोडावे.<br>ज्या अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्राकरीता अंगणवाडी सेविकेचे / मदतनिसचे / मिनी अंगणवाडी सेविकेचे नियुक्ती करावयाची आहे, अशा अंगणवाडीमध्ये 50% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरीक्त इतर भाषा ( उदा. उर्दु, हिंदी , माळीया, गोंड, कोकणी , पावरी, कन्नड, कोरकु, तेलगु, भिल्लोरी , बंजारा इ.पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये सेविका किंवा मदतनिस किंवा मिनी अंगणवाडी सेविका यांच्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या ( लिहीता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी. तथापी अशा उमेदवाराने 10 वी अथवा परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हते पैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. |
| 9 | विधवा किंवा अनाथ उमेदवरांबाबत | 1. विधवा उमेदवरासाठी पतीचा मृत्यु दाखला व स्वप्रतिज्ञापत्र आवश्यक.<br>2. अनाथ असल्यास महिला व बाल विकास विभागाचे सक्षम |

| | | |
|---|---|---|
| | | प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>3. विधवा किंवा अनाथ उमेदवारा असल्यास शासन निर्णयानुसार अतिरीक्त गुण देण्यात येतील. |
| 10 | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे स्थानिक रहीवाशी असावे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बदलीचे कोणतेही प्रावधानराहणार नाही. |
| 11 | मागासवर्ग/ प्रवर्ग | अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती/ भटक्या जाती/ भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्ग या उमेदवारांनी प्रमाणपत्र सोबत जोडावे. यास अतिरीक्त गुण दिले जातील. |
| 12 | अनुभव | शासकीय यंत्रणेतील अंगणवाडी सेविका/ मदतनिस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणुन कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास वरील नमुद शासन निर्णयानुसार अतिरीक्त गुण दिले जातील. सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 13 | जाहीरात प्रसिध्दी | दि. 03/09/2026 किंवा 04/09/2026 |
| 14 | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | कार्यालयीन कामकाजाच्या 10 दिपसापर्यंत 07/09/2026 ते 23/09/2026 स्विकारण्याची कार्यालयीन वेळ (सकाळी 12.00 ते 5.00 वाजेपर्यंत) |
| 15 | प्राथमिक यादी | अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकापासुन 15 दिवस (कार्यालयात / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल |
| 16 | यादीस हरकती | कार्यालयात / नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासुन पुढील 10 दिवसापर्यंत |
| 17 | भरतीची पुर्ण कार्यवाही | जाहीरात प्रसिध्द केल्यापासुन 90 दिवसात |
| 18 | प्रतीक्षा यादी | जर उमेदवार हा नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसापर्यंत रुजु झाला नाही किंवा त्यास अपात्र ठरविण्यात आले तर प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतीक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन 1 वर्षापर्यंत वैध राहील. |
| 19 | निवड प्रक्रीयेविरुध्द तक्रार किंवा अपील | 1. प्राथमिक गुणानुक्रमयादीतील कोणत्याही उमेदवाराची वैयक्तिक माहीती खोटी असल्याची अर्ज केलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | उमेदवारांची तक्रार असल्यास यादी प्रसिध्द झाल्यापासुन 10 दिवसांच्या आत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अमरावती दक्षिण यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार करावी . त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही.<br>2. निवड यादी घोषित झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत मा. विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास अमरावती विभाग अमरावती यांचेकडे अपील दाखल करता येईल. |
| 20 | कागदपत्राच्या प्रती | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या प्रती स्वत:स्वाक्षांकीत केलेल्या असाव्यात.अर्जासोबत नमुद कागदपत्रांच्या प्रती नसल्यास अर्ज ग्राहय धरल्या जाणार नाही. अर्ज सादर करतेवेळीच सर्व आवश्यक नमुद कागदपत्रांच्या स्व-साक्षांकीत प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| 21 | अर्ज | जाहीरातीमध्ये दिलेल्या विहीत नमुन्यातीलच अर्ज करावा. |
| 22 | निवड प्रक्रिया | उमेदवराच्या शैक्षणिक गुणपत्रिकेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे 80 गुण आणि अतिरीक्त 20 गुण हेशासन निर्णयाप्रमाणे देय आहे. |
| 23 | पत्रव्यवहार | भरती प्रक्रीयेसंबंधी अर्जदारास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.सर्व सुचना जाहीरातीमध्ये अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. अर्ज पोस्टव्दारे स्वीकारले जाणार नाही. |
| 24 | या प्रकल्पाअंतर्गत अर्ज करण्याचे नगर परीषद क्षेत्र | 1. वरुड नगर परीषदेचे क्षेत्र<br>2. चांदुर बाजार नगर परीषदेचे क्षेत्र |
| 25 | निवड | पात्र उमेदवारांची वर उल्लेख केलेल्या परीसरातील रिक्त पदे असणाऱ्या कोणत्याही क्षेत्रातील अंगणवाडीकरीता निवड केली जाऊ शकते. त्या दृष्टीकोनातुन उमेदवाराची नियुक्त केलेल्या ठिकाणी काम करण्याची तयारी असावी. निवडीबाबतचा अंतीम निर्णय कार्यालयाचा राहील. त्याबाबत पसंती क्रम चालणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| 26 | भरतीबाबत | भरती प्रक्रीया कुठल्याही टप्प्यावर रदद करण्याचे अधिकार कार्यालयात राहते |
| 27 | शुध्दीपत्रक | सदरहु पदभरती प्रक्रीयेच्या अनुषंगाने वरीष्ठ कार्यालयातुन काही निर्देश अथवा सुचना प्राप्त झाल्यास त्यानुषंगाने सदर पद भरतीच्या बाबत शुध्दीपत्रक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात येतील याची नोंद घ्यावी. |
| 28 | शासन निर्णय | सदरील अंगणवाडी सेविका व बाल विकास विभाग , शासन निर्णय क्रमांक : एबावि-2022/प्र.क्र. 94/का-6, दिनांक 2 फेब्रुवारी 2023 व महाराष्ट्र 2023 व महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग , शासन निर्णय क्रमांक : एबावि- 2022 /प्र.क्र. 94/का-6 दि. 30 जानेवारी 2025 अन्वये करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra..gov.in या संकेतस्थळावर आहेत. |
| 29 | जाहीरातीबाबत शंका/अडचण - | सदरील जाहीराती बाबत काही शंका किंवा अडचण असल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अमरावती दक्षिण दत्त पॅलेस , दुसरा मजला, गांधी चौक , अमरावती 444601 या कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| 30 | एकुण मदतनिस रिक्त पदे - 3 | रिक्त जागा असलेल्या क्षेत्रांची नावे |

| अ.क्र. | कार्यक्षेत्र | रिक्त पदे |
|---|---|---|
| 1. | सावता चौक  वरुड | 1 |
| 2. | आठवडी बाजार, वरुड | 1 |
| 3. | चांदुर बाजार – 1 (उर्दु भाषिक उमेदवारासाठी फक्त) | 1 |

-स्वा -

बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी अमरावती दक्षिण

PHOTO

# अंगणवाडी मदतनिस (मानधनी) पदाकरीता अर्ज नमुना

प्रति,
मा. बाल विकास प्रकल्प अधकारी,
नागरी अमरावती दक्षिण

मी बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अमरावती दक्षिण अंतर्गत -------------------------------- कार्यक्षेत्रातील स्थानिक रहीवाशी असुन जाहीरातीमधील नमुद अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्ज केला आहे. माही वैयक्तीक माहीती खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे संपुर्ण नाव (कागदपत्रानुसार) | लग्नाआधीचे :-<br>लग्नानंतरचे :- | |
| 2 | रहीवाशी संपुर्ण पत्ता (स्थानिक रहीवाशी पुरावा सोबत जोडावा) | <br>संपर्क क्र.:- | |
| 3 | जन्मदिनांक :- / / | जाहीरातीचेदीनांकास वय :- | वर्ष महिने दिवस |
| 4 | अनु. जाती/ जमाती/इमाव/विमुजा/भजा/आर्थिकदृष्टया दु. घ. /वि.मा.प्र./ सा.व.शै. दृष्ट्या मा. प्रवर्ग :- | | |
| 5 | हयात अपत्यांची संख्या:- | शेवटच्या मुलाचा जन्मदिनाक | / / |
| 6 | विधवा / अनाथ आहे काय?<br>(असल्यास मृत्यु दाखला/ प्रतिज्ञा लेख) जोडावा | | |
| 7 | शैक्षणिक पात्रता – 12 वी उत्तीर्ण आवश्यक | उमेदवाराची मातृभाषा :-<br>(इयत्ता 10 बोर्ड सर्टीफिकेट आवश्यक) | |

| अ.क्र. | परीक्षा | परीक्षा बोर्ड | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |

| | |
|---|---|
| 8 | शासकीय अंगणवाडीतील सेविका/ मदतनिस पदाचा कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव आहे का?<br>(अनुभव कालावधीचे प्रमाणपत्र सोबत जोडावे) |
| 9 | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MSCIT) आहे का? -----------------<br>प्रमाणपत्र जोडणे आवश्यक |

मी याव्दारे प्रमाणित करते की, मी अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्ज केलेला असुन अमरावती नागरी दक्षिण अतर्गत येणाऱ्या -------------------------------- येथील स्थानिक रहीवाशी असुन माझ्या अर्जातील माहीती खरी व बरोबर आहे.

# अर्ज प्राप्त झाल्याबाबत उमेदवारास दयावयाची पोहोच पावती

श्रीमती ---------------------------------------------------------------------- रा. -----------------------

-------------------------------------------------------- यांच्याकडुन आज दिनांक / / 2026 रोजी

अंगणवाडी मदतनिस या पदासाठी अर्ज प्राप्त झाला आहे.

करीता पोहोच पावती देण्यात येत आहे.

दिनांक :-

**कागदपत्रे –**

1.
2.
3.
4.
5.
6.
7.
8.
9.
10.

स्वाक्षरी

नाव :- ------------------------------------

पदनाम :- ----------------------------

# अपत्त्य प्रमाणपत्र (स्वप्रतिज्ञापत्र)

प्रमाणित करण्यात येते की श्रीमती ---------------------------------------------------------------
या नगर परीषद रहीवाशी असुन मला आज रोजी दिनांक / / 2026 पर्यंत इतकी अपत्ये आहेत.

दिनांक :-

ठिकाणी :-

स्वाक्षरी

# सेविका/मदतनिस पदाकरीता

**उमेदवाराचं नाव (माहेरचे नाव):------------------------------------------------------**

**(सासरचे नाव):-----------------------------------------------------------------------**

**अर्जाचा नोंदणी क्रमांक----------------------------------------**

उपलब्ध असल्यास सर्व शैजजिज खालील प्रमाणपत्रे जोडावीत म्हणजेच त्या आधारे गुणदान करता येईल

| अक्र | प्रमाजपत्रे | प्रमाणपत्राचे नाव लिहावे | पेज नंबर |
|---|---|---|---|
| 1 | **गॅस कार्ड/बॅंक पासबुक जाहीरातीच्या दिनांकाच्या एक महिना अगोदर** | | |
| 2 | **घरटॅक्स पावती (घर भाडयाने असल्यास घर मालकाची अफीडीबीट कॉफी** | | |
| 3 | **इलेक्ट्रीक बिल** | | |
| 4 | **राशन कार्ड** | | |
| 5 | **आधार कार्ड** | | |
| 6 | **शाळा सोडल्याचा दाखला** | | |
| 7 | **लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र** | | |
| 8 | **विधवा :- संबधित जोडलेली कागदपत्रे मृत्युदाखला, प्रतिज्ञापत्र** | | |
| 9 | **इयत्ता 10 बोर्ड सटीफीकेट** | | |
| 10 | **12 मार्कशीट/समकक्ष मुक्त विदयापिठ मार्कशीट** | | |
| 11 | **पदवी मार्कशीट** | | |
| 12 | **पदव्युत्तर मार्कशीट** | | |
| 13 | **डि.एड मार्कशीट** | | |
| 14 | **बी.एड मार्कशीट** | | |
| 15 | **संगणक प्रमाणपत्र (MSCIT)** | | |
| 16 | **शासकिय अनुभव(अंगणवाडीच्या पदाचा)** | | |
| 17 | **अ.अुन जाती जमाती ब इमाव/विजा/भज/आर्थिक दुर्बलघटक/विमाप्र/सा.व शै.दृष्टया मा.प्रवर्ज वर्गाचे प्रमाणपत्र** | | |
| 18 | **विधवा/अनाथ प्रमाणपत्र** | | |
| 19 | **इतर** | | |

अर्ज व त्यासोब जोडलेली कागदपत्रे यावर अनुक्रमाने क्रमांक टाकावे व सदरच्या तक्तात ते संबधित कागदपत्रा समोर नोंदवावे त्याशिवास तुमचा अर्ज स्विकारल्या जाणार नाही

**अर्जदाराची सही व नाव**

(शासननिर्णय ,सामान्यप्रशासनविभाग 9 मार्च 2015 नुसार)

-:विधवा स्वघोषणाप्रमाणपत्र:-

मी ______________________________ श्री.______________________ याचीपत्नी

वय _______ वर्ष,आधारक्रमांक __________________ व्यवसाय____________ राहणार

____________________ याव्दारेघोषितकरतेकी,माझ्यापतीचेनिधनदि. / /

रोजीझालेलेअसूनमीसदयस्थितीतपुनर्विवाहकेलेलानाही.

करितामीविधवाअसल्याचेयास्वघोषणाप्रमाणपत्राव्दारेघोषितकरितआहे.सदरमाहितीखोटीआढळूनआल्यास

,भारतीयदंडसंहीताअन्वयेआणि

/किंवासंबंधितकायदयानुसारमाझ्यावरखटलाभरलाजाईलवत्यानुसारमीशिक्षेसपात्राहील .याचीमलापुर्णजाणीवआहे.

ठीकाण अर्जदाराचीसही

दिनांक:- / / 2026 अर्जदाराचेनाव:-

| अक्र | शैक्षणिक पात्रता गुणपत्रिकाच्या आधारेगुण /बाब | द्यावयाचे गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | इयत्ता 12 वी/ किंवा शासनमान्य समकक्ष पात्रता- गुणपत्रक व बोर्ड सर्टिफिकेट | | |
| 1 | 80% पेक्षा जास्त | 60 गुण | |
| | 70.01 ते 80 टक्के पर्यंत | 55 गुण | |
| | 60.01 ते 70 टक्के पर्यंत | 50 गुण | |
| | 50.01 ते 60 अक्के पर्यंत | 45 गुण | |
| | 40टक्के ते 50 टक्के पर्यंत | 40 गुण | |
| | 40 टक्के पेक्षाकमी | 35 गुण | |
| 2 | पदवी पास- गुणपत्रक व डिग्री सर्टिफिकेट | 10 गुण | |
| 3 | पदव्युत्तर पदवी पास--गुणपत्रक व डिग्री सर्टिफिकेट | 04 गुण | |
| 4 | डीएड पास - गुणपत्रक व डिग्री सर्टिफिकेट | 02 गुण | |
| 5 | बीएड पास- गुणपत्रक व डिग्री सर्टिफिकेट | 02 गुण | |
| 6 | एम एस सी आय टी पास/समकक्ष अभ्यासक्रम — प्रमाणपत्र | 02 गुण | |
| | अतिरिक्त गुण/ बाब | | |
| 7 | विधवा-विधवा असल्यास प्रमाणपत्र/ पतीचा मृत्यु दाखला व स्वयंघोषणापत्र/ अनाथ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र | 10 गुण | |
| 8 | अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती- सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र | 05 गुण | |
| 9 | इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती/भटक्या जमाती/आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र | 03 गुण | |
| 10 | अंगणवाडी सेविका/मदतनीस/मिनी सेविका म्हणुन कमीम कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास- सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र | 02 गुण | |
| 11 | एकुण गुण | 100 गुण | |

स्वाक्षरी :------------------------------------------------ स्वाक्षरी :- --------------------------------------

नाव:-------------------------------------------------- नाव:- ----------------------------------------------

पदनाम:-------------------------------------------------पदनाम:------------------------------------------

# अंगणवाडी मदतनिस पदाकरीता

# जाहीरात 2026-27

# बाल विकास प्रकल्प अधिकारी

# नागरी अमरावती दक्षिण

टिप :- अर्ज वगळुन सोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रे मार्कशीट, कागदपत्रे यांना अनुक्रमांक टाकावेत.